# सार्वजनिक उपक्रम समिती

**समितीची रचना, कार्यपध्दती व कामे**

प्रशासकीय कामांच्या सोयीसाठी शासनाने अनेक शासकीय महामंडळे व कंपन्या स्थापन केलेल्या आहेत. अशी महामंडळे आणि कंपन्या यांच्या भागभांडवलात शासनाचा मोठा (किंवा जवळ-जवळ संपूर्ण) वाटा असतो. सदर महामंडळे व कंपन्या शासनाने नेमलेल्या संचालकांद्वारे चालविण्यात येतात. अशा महामंडळाचे व कंपन्यांचे वार्षिक प्रशासकीय अहवाल सभागृहाच्या पटलावर वेळोवेळी ठेवण्यात येतात. त्याचप्रमाणे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेही सार्वजनिक उपक्रमासंबंधातील लेखापरीक्षा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. सदर अहवालांची छाननी करुन त्यासंबंधीचे आपले अभिप्राय आणि शिफारशींची प्रतिवेदने विधानमंडळास सादर करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक उपक्रम समितीची दिनांक १६ सप्टेंबर, १९६६ मध्ये स्थापना करण्यात आली. सदर समितीचा कालावधी सुरुवातीच्या काही काळात विधानसभेच्या कालावधी इतकाच म्हणजे ५ वर्षाचा होता. नंतर हा कालावधी विधानमंडळाच्या इतर समित्यांप्रमाणे एक वर्षाचा करण्यात आला.

या समितीवर सध्या एकूण २५ सदस्य आहेत. महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २११ व महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २०९ अन्वये मा.अध्यक्ष व मा.सभापती यांचेकडून अनुक्रमे विधानसभेचे २० सदस्य व विधानपरिषदेचे ५ सदस्य असे एकूण २५ सदस्य नामनियुक्त केले जातात.

**सार्वजनिक उपक्रम समितीची रचना - (विधानसभा नियम २११) (१)** दरवर्षी विधानसभेच्या किंवा यथास्थिती, नव्याने रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर सार्वजनिक उपक्रम समितीची रचना करण्यात येईल. ही समिती अध्यक्षांनी विधानसभा सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले वीस सदस्य आणि सभापतींनी विधानपरिषद सदस्यांमधून तशाच प्रकारे नामनिर्देशित केलेले पाच सदस्य यांची मिळून होईल.

परंतु, कोणत्याही सार्वजनिक उपक्रमामध्ये ज्यांचा आर्थिक हितसंबंध असेल असा कोणताही सदस्य, समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केला जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असणार नाही.

(२) समितीचे सदस्य, नवीन समितीची स्थापना होईपर्यंत पद धारण करतील.

**सार्वजनिक उपक्रम समितीची कामे.** (विधानसभा नियम २१२)

(एक) तिसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेले सार्वजनिक उपक्रम आणि सभागृहांकडून वेळोवेळी ठरविण्यात येतीत असे इतर उपक्रम यांचे अहवाल आणि लेखे तपासणे.

(दोन) उक्त उपक्रमासंबंधी नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे काही अहवाल असल्यास ते तपासणे.

(तीन) उक्त उपक्रमांची स्वायतत्ता आणि कार्यक्षमता यांच्या संदर्भात त्या उपक्रमाचे व्यवहार सुस्थिर व्यापारी तत्वावर आणि दूरदृष्टीच्या वाणिज्य प्रथांनुसार करण्यात येत आहेत किंवा कसे याचे परीक्षण करणे, आणि

(चार) उक्त उपक्रमांच्या बाबतीत लोकलेखा समितीकडे आणि अंदाज समितीकडे विहित केलेली तथापि वरील खंड (एक), (दोन) आणि (तीन) खाली न येणारी आणि अध्यक्ष वेळोवेळी ह्या समितीकडे नेमून देतील अशी इतर कामे.

परंतु समिती खालीलपैकी कोणत्याही बाबींचे परीक्षण किंवा तपासणी करणार नाही.

(एक) उक्त उपक्रमांच्या व्यापारी किंवा वाणिज्य कामाव्यतिरिक्त शासनाच्या प्रमुख धोरणासंबंधीच्या बाबी

(दोन) दैनंदिन प्रशासनाच्या बाबी, आणि

(तीन) कोणत्याही परिनियमान्वये ज्या बाबी विचारात घेण्यासाठी खास यंत्रणा स्थापन करण्यात आली असेल अशा बाबी.

**समितीस सामान्य नियम लागू असणे -** इतर बाबीतीत समितीसंबंधीच्या या सभागृहाच्या कार्यपध्दतीच्या नियमांत अध्यक्ष जे बदल किंवा फेरफार करतील त्यासह ते लागू होतील.

## तृतीय अनुसूची

### (विधानसभा नियम २१२ पहा)

विधानमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यकक्षेतील सार्वजनिक उपक्रमांची यादी :-

### गृह विभाग

१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ.

२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ.

३) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ.

### जलसंपदा विभाग

४) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ मर्यादित.

५) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ मर्यादित.

६) गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ मर्यादित.

७) तापी पाटबंधारे विकास महामंडळ मर्यादित.

८) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ मर्यादित.

### महसूल व वन विभाग

९) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ

१०) महाराष्ट्र वन विकास महामंडळ

### नगरविकास विभाग

११) महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ

१२) महराष्ट्र जीवन प्राधिकरण

१३) महाराष्ट्र नागरी पायाभूत विकास कंपनी मर्यादित

### वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

१४) हाफकीन बायो-फार्मा स्युटिकल महामंडळ मर्यादित

१५) अजिंठा फार्मा स्युटिकल मर्यादित

## गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग

१६) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा)

१७) शिवशाही पूनर्वसन प्रकल्प

## उद्योग, उर्जा व कामगार विभाग

१८) महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन)

१९) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल महामंडळ मर्यादित

२०) कोकण विकास महामंडळ मर्यादित

२१) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित

२२) मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित

२३) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित

२४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित

२५) महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ मर्यादित

२६) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

२७) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित

२८) महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित

२९) कृपानिधी मर्यादित

३०) गोदावरी गारमेंट्स मर्यादित

## कृषि, पशुसंवर्धन दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग

३१) मॅफको मर्यादित

३२) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

३३) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ

३४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित

३५) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित

३६) महाराष्ट्र किटकनाशके (इनसेक्टीसाइडस) मर्यादित

## सहकार व वस्त्रोद्योग विभाग

३७) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विभाग

३८) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ मर्यादित

३९) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित

४०) महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित

४१) महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ

## सामाजिक न्याय विभाग

४२) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

४३) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

४४) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

४५) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित

४६) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ

४७) इतर मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

## सांस्कृतिक कार्य विभाग

४८) महाराष्ट्र चित्रपट रंगभूमि आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित

४९) कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित

## महिला व बालकल्याण विभाग

५०) महिला आर्थिक विकास महामंडळ

## सार्वजनिक बांधकाम विभाग

५१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

## आदिवासी विकास विभाग

५२) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ

५३) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित

## रोजगार व स्वयंरोजगार विभाग

५४) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

५५) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ

**नियोजन विभाग**

५६) महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ मर्यादित

५७) चितळी डिस्ट्रीलरी मर्यादित

**जलसंधारण विभाग**

५८) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ

+ दिनांक ६ ऑगस्ट, १९८० रोजी फक्त दहा मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यकक्षेत होती.

**समितीच्या कार्यकक्षेतील उपक्रम**

सुरुवातीला समितीकडे फक्त तीन उपक्रमांचे कामकाज सोपविण्यात आले होते. त्यानंतर दहा उपक्रमांचे कामकाज सोपविण्यात आले आणि दिनांक ६ ऑगस्ट १९८० रोजी विधानसभेने संमत केलेल्या ठरावानुसार त्यावेळी अस्तित्वात असलेली सर्व महामंडळे/उपक्रम, सार्वजनिक उपक्रम समितीच्या कार्यकक्षेत आणली. त्याचबरोबर सदर ठरावान्वये भावी काळात स्थापन होणारी अशा प्रकारची महामंडळे वा उपक्रमांच्या परीक्षणाचे कामही या समितीकडे सोपविण्यात आले. सध्या राज्यत ५८ शासकीय कंपन्या (२१ दुय्यम कंपन्यांसह) अस्तित्वात आहेत. सदर उपक्रमाची यादी विधानसभा नियमावलीतील तृतीय अनुसूचीत नमूद करण्यात आलेली आहे.

**समितीची सर्वसाधारण कार्यपध्दती**

विधानसभा नियमावलीत नियम १६३ ते १९३ मध्ये तसेच विधानपरिषद नियमावलीतील नियम १५८ ते १८८ मध्ये समित्यांच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीची माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे समितीने आपली स्वत:ची पध्दत अवलंबिण्यासंबंधी अंतर्गत कामकाजासंबंधीचे नियम केलेले आहेत. वरील पध्दतीनुसार कामकाज करण्याबाबत समिती साधारणपणे आपला वर्षाचा एकंदर कार्यक्रम ठरवित असते. समितीकडे सोपविण्यात आलेल्या ५८ मंडळाच्या/महामंडळाच्या तपासणीचे काम करण्यासाठी कार्यक्रम ठरविला जातो. सदर कार्यक्रम ठरविताना या उपक्रमांचे वार्षिक प्रशासन अहवाल आणि महालेखापरीक्षकांनी दिलेले लेखापरीक्षा अहवाल यांचा विशेष उपयोग होतो. तूर्त मा.अध्यक्षांनी कोणत्याही विशिष्ट उपक्रमाबाबत तपासणी करण्याचे आदेश समितीला दिलेले नाहीत.

## समितीने अहवालाद्वारे केलेल्या महत्वाच्या शिफारशी -

**महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित आणि वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित.**

**(१) शासकीय कंपन्यांनी सहकारी बँकेत केलेली अवैध गुंतवणूक-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन १९९८-९९ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण चार परिच्छेद क्रमांक ४ अ-२ मध्ये **"शासकीय कंपन्यांनी सहकारी बँकेत केलेली अवैध गुंतवणूक"** या संबंधात महालेखाकारांनी आक्षेप घेतले होते.

यासंबंधात लेखापरिक्षकांकडून प्राप्त झालेली माहिती, महामंडळाकडून प्राप्त झालेली लेखा माहिती, तसेच महामंडळाचे प्रतिनिधी व विभागीय सचिव यांच्या साक्षीद्वारे समितीच्या असे निदर्शनास आले की, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ या तीन शासकीय कंपन्यांनी शासनाचे निर्देश दुर्लक्षित करुन आवामी मर्कटाईल को.ऑप.बँक या दिवाळखोरीत निघालेल्या बँकेत ५ कोटी रुपयांची गुंतवणूक केल्यामुळे सुमारे ४.५ कोटी रुपये इतकी रक्कम बुडीत खात्यात जमा होण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली आहे. (५ कोटी पैकी ५० लाख रुपये धनादेशाद्वारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास प्राप्त झाले आहे.) केवळ अव्वल श्रेणीच्या राष्ट्रीय विकास बँकेमध्ये शासकीय कंपन्यांनी गुंतवणूक करावी असे शासनाचे निर्देश असतानाही बँकेचा दर्जा पडताळून न पहाता या शासकीय कंपन्यांनी गुंतवणूक केली. मुदतठेवीच्या पावत्यादेखील संबंधित बँकांनी वेगळ्या नावाने दिल्या, ३० दिवसाकरिता रक्कम गुंतविली असतांना देखील मुदत ठेवीच्या पावत्या मात्र २७० दिवस मुदतीत दिल्या गेल्या व त्याकडे त्या शासकीय कंपन्यांनी दुर्लक्ष केले एवढेच नव्हेतर या ठेवीच्या पावत्या देखील संबंधित महामंडळास ५ ते ६ वर्षाच्या विलंबाने देण्यात आल्या. समितीच्या असेही निदर्शनास आले की, तत्कालीन समाजकल्याण मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकाने लेखी स्वरुपांत महामंडळाच्या कार्यकारी संचालकावर दबाव आणून गुंतवणूक करावयास लावली.

ही परिस्थिती लक्षांत घेता, समितीने या संबंधात अशी शिफारस केली की, या अपहारास जबाबदार असलेल्या सर्व तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांची व संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करावी. संबंधित व्यवस्थापकीय संचालकांच्या तसेच अधिकाऱ्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेमधून ही वसूली करण्याच्यादृष्टीने देखील शासनाने पावले उचलावीत. ज्या समाजकल्याण मंत्र्यांच्या स्वीय सहाय्यकांनी या प्रकरणी लेखी दबाव आणल्याचे समितीसमोर आले आहे त्या स्वीय सहाय्यकावर देखील शासनाने कडक कारवाई करावी व त्यांच्या स्थावर जंगम मालमत्तेमधून ही वसूली शासनाने करावी.

## समितीने अहवालाद्वारे केलेल्या महत्वाच्या शिफारशी -

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ

**मायमराठी वाहिनी :-**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन १९९९-२००० च्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेद क्रमांक २ अ १.८.३.४ "मायमराठी वाहिनी" संबंधात महालेखाकारांनी निधीचा अपव्यय केल्याबद्दल आक्षेप घेतला होता.

यासंबंधात समितीला महामंडळाकडून प्राप्त झालेले लेखी ज्ञापन तसेच विभागीय प्रतिनिधींचा साक्षीपुरावा याद्वारे असे आढळून आले की, या वाहिनीकरिता राज्यशासनाने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास २.३३ कोटी रुपये दिले होते त्यापैकी महामंडळाने ही वाहिनी प्रसारीत करण्याकरिता १.८३ कोटी रुपये खर्च केले. कार्यक्रमांची निवड आणि प्रत्येक मालिकेला द्यावयाची रक्कम निश्चित करण्यासाठी नाटक व चित्रपट क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तींचे स्वतंत्र व कुशल पंचमंडळ स्थापन करावयाचे होते. परंतु असे पंचमंडळ स्थापन करण्यात आले नाही. गैरसोयीच्या वेळेमुळे (सायंकाळी ६ ते ६.३०) मोठ्या शहरांतील प्रेक्षक वाहिनीचे कार्यक्रम पाहू शकत नाहीत हे निदर्शनास आल्यावर कंपनीने वेळ बदलण्यासाठी प्रसार भारतीकडे विचारणा केली परंतु वाहिनीला दिलेली वेळ बदलण्यासाठी प्रसार भारतीने नकार दिला. प्रक्षेपणासाठी कंपनीकडे पुरेसे कार्यक्रम उपलब्ध नसल्यामुळे एप्रिल १९९९ मध्ये प्रक्षेपण थांबवण्यात आले. अशाप्रकारे सुमारे १.८३ कोटीचा खर्च निरुपयोगी ठरला. ही वस्तुस्थिती लक्षांत घेता समितीने या संबंधात अशी शिफारस केली की, मराठी भाषा व संस्कृती यांच्या वृध्दीसाठी "मायमराठी वाहिनी" दूरदर्शनच्या राष्ट्रीय वाहिनीवर सुरु असणे आवश्यक आहे. दूरदर्शनवर सह्याद्रीसारख्या नव्या वाहिन्या सुरु होऊन चांगल्याप्रकारे चालू शकत असताना महामंडळावर मात्र ही वाहिनी बंद करण्याची पाळी आली याबाबत समितीस सखेद आश्चर्य वाटते. मराठी भाषेचा उत्कर्ष व प्रसार होण्याचे दृष्टीने महामंडळाने ही वाहिनी पुन्हा सुरु करण्याच्या दृष्टीने नियोजनबध्द प्रयत्न करावेत. प्रसारभारतीकडे पाठपुरावा करुन सोयीची वेळ देखील मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. कार्यक्रमाच्या प्रसारणासाठी प्रायोजक मिळविण्याच्यादृष्टीने देखील महामंडळाने कसोशीने प्रयत्न करावेत. कार्यक्रमाची निवड व प्रत्येक मालिकेला द्यावयाची रक्कम निश्चित करण्यासाठी नाटक व चित्रपट क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तींचे स्वतंत्र व कुशल पंचमंडळ स्थापन करुन त्यांचेमार्फत कार्यक्रमाचे नियोजन करावे.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

**३ (अ) जमिनीचा वापर व भूभाग आखून देणे-**

भारताचे नियंत्रक व महालेखपरिक्षक यांच्या सन २०००-२००१ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ३ ब १.५.१.२ (अ, ब व क) "जमिनीचा वापर व भूभाग आखून देणे" याबाबत महालेखाकारांनी कल्याण-भिवंडी विभागातील अतिरिक्त क्षेत्राचा विकास तसेच पुणे विभागातील काही क्षेत्र विकसित करण्यात होत असलेली हयगय याबाबत आक्षेप घेतला होता. या संबंधात महामंडळाकडून केलेला सुमारे ९.४१ कोटीचा विकास खर्च अनुत्पादित राहिल्याने तसेच कित्येक लाखांचा महसूल महामंडळ मिळवू शकले नाही असे महालेखाकारांनी नमूद केले होते.

याप्रकरणी समितीला शासनाकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापन व तसेच विभागीय सचिवांची महामंडळाच्या प्रतिनिधीची साक्ष याद्वारे समितीस असे आढळून आले की, महामंडळाच्या ताब्यात असलेल्या सुमारे १५९६० हेक्टर जमिनीपैकी फक्त ८९६३ हेक्टर जमिन उद्योजकांना वाटप करण्यासाठी आखून देण्यात आलेली आहे. महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनीपैकी आखून दिलेल्या भूभागाची टक्केवारी जवळ-जवळ ५०% च्या आसपास भरते. याचाच अर्थ असा की, महामंडळाने संपादित केलेल्या जमिनीपैकी जवळ-जवळ ५०% जमिन पडून असून महामंडळाचा फार मोठा निधी त्यांत अडकून पडला आहे. या जमिनीचा महामंडळास लाभ होत नाहीच परंतु ही जमिन ज्या शेतकऱ्यांकडून घेतली आहे त्यांनाही त्याचा लाभ होत नाही. अनेक ठिकाणी उद्योजक आकर्षित होतील या आशेवर महामंडळाने करोडो रुपये खर्च करुन पायाभूत सुविधा निर्माण केल्या असताही उद्योजक त्याठिकाणी फिरकत नाहीत. महामंडळाने फार मोठ्या प्रमाणावर जमिन संपादित करुन व तिच्या विकासासाठी करोडो रुपये खर्च करुन देखील त्यापासून आवश्यक तो लाभ महामंडळास मिळत नाही. ज्या उद्दीष्टासाठी जमिन संपादित केली जाते ते उद्दीष्ट २० वर्ष उलटून देखील पूर्ण होत नसेल व जमिन विनावापर पडून राहत असेल तर ते एकप्रकारे राष्ट्रीय नुकसान असून त्यासंबंधात व्यवहारीक दृष्टीकोन अवलंबिणे आवश्यक आहे.

ही वस्तुस्थिती लक्षांत घेता समितीने या संबंधात अशी शिफारस केली की, औद्योगिक वसाहतीसाठी संपादित केलेली जमिन जर १० वर्षांपेक्षा जास्त काळ पडून राहिली असेल वा

तेथे एकही उद्योग सुरु झाला नसेल वा होऊ शेकत नसेल तर अशी जमिन संपादन करतेवेळी दिलेला मोबदला व त्यावर काही प्रमाणात व्याज अशी आकारणी करुन शेतकऱ्यांना परत करण्याच्यादृष्टीने महामंडळाने पावले उचलावीत. ज्या ठिकाणी अंशत: औद्योगिकरण झाले आहे परंतु तेथील सर्व उद्योग हे कित्येक वर्षे बंद पडले आहेत व ते उद्योग पुन्हा सुरु होण्याची शक्यता नाही अशा प्रकरणासंबंधातील जमिनीदेखील मूळ शेतकऱ्यांना परत करण्याबाबत महामंडळाने विचार करावा. ज्या औद्योगिक वसाहतीतील अनेक भूखंड रिक्त आहेत त्या परिसरातील शिक्षणसंस्थानी शैक्षणिक कार्यासाठी रिक्त भूखंडाची मागणी केल्यास व्यवहारीक दृष्टीकोन समोर ठेवून महामंडळानी मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. मात्र औद्योगिक घटकाला भूखंड द्यावयाचा की शैक्षणीक संस्थेस भूखंड द्यावयाचा असा प्रश्न उद्‌भवल्यास औद्योगिक घटकास प्रथम प्राधान्य देण्यात यावे.

**(ब) होजियरी व चामडे संकूल**

भारताचे नियंत्रक व महालेखपरिक्षक यांच्या सन २०००-२००१ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ३ ब १.११ यामध्ये "होजियरी व चामडे संकुल" या संबंधात महालेखाकारांनी महामंडळाने मुंबई महानगर क्षेत्रातील अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक वसाहतीमध्ये ८० हेक्टर जमिनीवर चामडे संकूल व ४० हेक्टर जमिनीवर होजियरी संकूल कोणतीही निश्चित मागणी नसताना १९९५-९६ ते २०००-२००१ या कालावधीत रुपये ७९.४६ कोटीचा खर्च करुन उभारले याबाबत आक्षेप घेतला होता. यासंबंधात महामंडळाने केलेला सुमारे ७९.४६ कोटीचा खर्च अनुत्पादित राहिल्याने कित्येक लाखांचा महसूल महामंडळ मिळवू शकले नाही असे महालेखाकारांनी नमूद केले होते.

याप्रकरणी समितीला शासनाकडून प्राप्त झालेले स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापन तसेच विभागीय सचिवांची व महामंडळाच्या प्रतिनिधींची एकत्रित साक्ष याद्वारे समितीस असे आढळून आले की, "होजियरी संकुल" उभारण्यापूर्वी त्याकरिता येणाऱ्या मागणीचा व्यापारी तत्त्वावर विचार महामंडळाने केला नसल्यामुळे हा निरर्थक खर्च झाला. धारावी येथील चर्मोद्योग व्यवसायीकांनी महामंडळाकडे त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्यास अंबरनाथ येथे जाण्याची तयारी दर्शविली होती. परंतु महामंडळाने चामडे संकुलाचे काम सुरु करण्यापूर्वी

धारावी येथील चर्मोद्योगांकडून अंबरनाथ येथे स्थलांतरीत होण्याबाबतचे हमीपत्र लिहून घेतले नव्हते. त्यामुळे महामंडळ त्यांच्यावर अंबरनाथ येथे जाण्याकरिता कायदेशीररित्या कोणताही दबाव टाकू शकत नव्हते. देशभरांतील होजियरी उद्योजकांकडून देखील ते मुंबईस येण्यास तयार आहेत काय याबाबतची कोणतीही खातरजमा महामंडळाने करुन न घेताच "होजियरी संकुल" उभारले. परंतु आजवर एकही होजियरी उत्पादकांकडून भूखंडाकरीता मागणी आलेली नसून १९९७ सालापासून सदरहू संकुल अक्षरशः पडून आहे. समितीच्या मते व्यापारी तत्वावर काम करणारे हे महामंडळ उपलब्ध निधीचा निरर्थक खर्च तसेच गैरवापर कसे करत आहे याचा हा चिंतनीय नमुना आहे. या सर्व व्यवहारांत माहमंडळाची नियोजनशुन्यता व आर्थिक दृष्टीचा अभाव समितीला प्रकर्षाने दिसून आला. महामंडळाच्या अशा अदूरदर्शी व्यवहारावर शासनाने देखील कोणतेही नियंत्रण ठेवले नाही. याबाबत समितीने सखेद आश्चर्य व्यक्त केले असून महामंडळाने अदूरदर्शीपणे सुमारे ८० कोटी रुपयांची निरर्थक गुंतवणूक करुन निधीचा गैरवापर केला असे समितीचे मत झाले.

ही वस्तुस्थिती लक्षांत घेता समितीने यासंबंधात अशी शिफारस केली की, समुचित व्यापारी तत्व तसेच सुजाण वाणिज्यिक प्रथांना हरताळ फासून केलेल्या या निधीच्या गुंतवणूकीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन संकुल बांधण्याचा निर्णय घेण्यापासून ते संकुल पूर्ण होईपर्यंत यामध्ये वरिष्ठ पातळीपासून जे-जे अधिकारी गुंतले आहेत व ज्यांनी यामध्ये उणीवा तसेच त्रुटी ठेवल्या व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन घेण्याकडे दुर्लक्ष केले त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन महामंडळाचे अनाठायी गुंतवणूकीमुळे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करावे.

धारावी येथील चर्मोद्योगामुळे मुंबईतील प्रदुषणांत होत असलेली वाढ लक्षात घेता महानगरपालिकेशी सल्लामसलत करुन धारावी येथील चर्मोद्योगांना अंबरनाथ येथे जाणे कसे भाग पाडता येईल तसेच होजियरी संकुलाचा योग्य प्रकारे वापर होण्याच्या दृष्टीने देशभरातील निरनिराळ्या उद्योजकांबरोबर चर्चा करुन त्यांना अंबरनाथ येथे येण्याकरिता कसे आकर्षित करता येईल यादृष्टीने महामंडळाने युध्दपातळीवर प्रयत्न करावेत. भविष्यांत महामंडळाने अशी निरर्थक खर्चाच्या बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित :-

**" खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य"**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.३ मध्ये **"खाजगी संस्थेला अनियमित वित्तीय सहाय्य"** यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,

याप्रकरणी समितीला मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, "हम एक है" या कार्यक्रमाचा करार फिल्म सिटीने एका खाजगी कंपनी सोबत केला होता. त्यासाठी फिल्म सिटीचे करारापूर्वीचे खाते क्र.२१७ व करारानंतर खाजगी कंपनीचे खाते क्र.१४२ हे एचईएच-फिल्मसिटी या नावाने हे बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत उघडण्यात आले होते. हे खाते श्री.शाहब अहमद व श्री.अ.ग.शुक्ल यांचे नावे संयुक्त खाते म्हणून उघडण्यात आले होते. फिल्मसिटीच्या खाते क्रमांक २१७ या खात्यामधून संचालक मंडळाची परवानगी न घेता खाजगी व्यक्तींच्या खात्यावर रु.१८० कोटींची रक्कम या अपहारात समावेश असलेल्या श्री.गोविंद स्वरुप, श्री.अ.ग.शुक्ल, श्रीमती आर.विमला, शाहब अहमद व बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी वर्ग केली. फिल्मसिटीचे पैसे अवैधरित्या व मान्यतेशिवाय वर्ग करुन तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.गोविंद स्वरुप यांनी मनमानीपणे महामंडळाच्या पैशांचा स्वत:च्या व खाजगी संस्थेच्य फायद्यासाठी गैरवापर केला आहे. तसेच संस्थेच्या मालकाने सदर रक्कम रोख व धनादेशाद्वारे कुणाच्याही मान्यतेशिवाय अवैधरित्या तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री.गोविंद स्वरुप, श्री.अ.ग.शुक्ल इ. लोकांच्या संगनमताने एच.ई.एच. फिल्मसिटी या खात्यामधून काढून घेतली. अश रितीने एका खाजगी संस्थेबरोबर संचालक मंडळाची मान्यता न घेता संयुक्त खाते उघडून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी नियमबाह्य कृत्य केले.

"हम एक है" हा कार्यक्रम दूरदर्शनवर प्रसारित करण्याची बाब प्रसार भारतीकडे फेब्रुवारी २००१ मध्ये नेण्यात आली. खाजगी संस्थेने प्रत्येक प्रसारणासाठी रु.८० लक्ष या दराने कमीत कमी हमी दरानुसार रु.४ कोटींची बँक हमी देणे आवश्यक असताना बँक ऑफ महाराष्ट्रने कंपनीच्या त्यावेळी असलेल्या व्यवसथापकीय संचालकांनी दिलेल्या सूचनांच्या आधारावर कंपनीच्या मुदत ठेवींच्या सुरक्षेवर रु.४ कोटींची संचालक मंडळाची मान्यता न घेता गैरप्रकारे हमी दिली. मात्र "हम एक है" या कार्यक्रमाचे प्रसारण करण्यास खाजगी संस्थेला

अपयश आले. प्रसार भारतीने महामंडळाने दिलेली रु.४ कोटी रकमेची हमी आवाहित केली. या रकमेपैकी खाजगी संस्थेने महामंडळास फक्त १५ लाख रुपये फेब्रुवारी २००१ मध्ये परत दिले व उर्वरित रक्कम ३.८५ कोटी संस्थेकडून २००४ पर्यंत वसूल झाली नाही. "हम एक है" कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मेसर्स मोन्टाजचे मालक श्री.शाहब अहमद व महामंडळाचे अर्थ सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी श्री.अ.ग.शुक्ल यांच्या स्वाक्षरीने संयुक्त खाते उघडण्यात आले. सदर खाते हे दोन्ही व्यक्तीने वैयक्तिक नावाने उघडले होते जे प्रचलित वित्तीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे विरोधी आहे. श्री.अ.ग.शुक्ल, तत्कालीन वित्तीय सल्लागार आणि लेखा अधिकारी हे महामंडळाच्या सेवेत असल्यामुळे त्यांनी केलेल्या नियमबाह्य कृत्याबद्दल महामंडळाने त्यांना सेवेतून बडतर्फ केले. मात्र श्री.गोविंद स्वरुप, तत्कालीन संचालक हे गैरव्यवहार करण्यास प्रामुख्याने जबाबदार आहेत. ते भारतीय प्रशासकीय सेवेतील असल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही. त्यांनी पध्दतशीरपणे, जाणीवपूर्वक अधिकाराचे उल्लंघन करुन महामंडळाला व संचालक मंडळाला अंधारात ठेवून, महामंडळाची दिशाभूल करुन, खाजगी कंपनीसोबत संधान बांधून शासनाच्या पैशांचा अवैधरित्या वैयक्तिक स्वार्थासाठी वापर करुन मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केला. असे असूनदेखील शासनाच्या संबंधित विभागांनी या संदर्भात भारतीय संविधानात नमूद केलेल्या तरतूदीनुसार व प्राप्त परिस्थितीत उपलब्ध असलेल्या कायदेशीर तरतूदीच्या आधारावर चौकशी व कार्यवाही केली नसून, जी चौकशी केली ती समितीच्या मते थातूर-मातूर व भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याला पध्दतीशी, जाणीवपूर्वक व हेतुपुरस्सरपणे एकंदरच सर्व प्रकरणांमधून श्री.गोविंद स्वरुप हे या व्यवहारातून न्यायालयातून व इतर चौकशी समित्यांमधून निर्दोष सुटावेत यासाठीच प्रयत्न केलेले दिसून येतात. कारण श्री. अ.ग.शुक्ल हे महामंडळाच्या सेवेत असल्यामुळेच त्यांना प्रकरण उघडकीस आल्याबरोबर तात्काळ बडतर्फ (Dismissed) करण्यात आले. मात्र गोविंद स्वरुप यांच्याबाबत संबंधित विभागानी तत्परता दाखविली नाही याचे समितीस केवळ आश्चर्यच वाटत नसून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची लॉबी असून ते त्यांच्या सेवेतील सहकाऱ्यांना कसे वाचविता येईल हेच पाहतात असे एकंदरीत सर्वच विभागीय सचिवांच्या साक्षीवरुन समितीस दिसून आले. एकंदरच हे प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या दृष्टीने या प्रकरणासंबंधित चौकशीत अधिकाऱ्यांनी व विभागप्रमुखांनी जाणीवपूर्वक अस्तित्वात

असलेला पुरावा बेदखल करुन तो **समितीसमोर येऊ दिला नाही. श्री.गोविंद स्वरुप यांच्या चौकशीसाठी समितीसमोर शासनाची बाजू मांडण्याकरिता उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने बाजू मांडून शासनाची भूमिका स्पष्ट केली. तेथे त्यावेळी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव** या दोन्ही पदावर कार्यरत श्री.गोविंद स्वरुप होते. शासनाच्या विभागात शासकीय सेवेतील कनिष्ठ व वरिष्ठ अधिकारी यांचे संबंध पाहता, उप सचिव दर्जाचे अधिकारी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या विराधातील बाजू समर्थपणे कशी मांडू शकतील हे समितीला एक कोडेच वाटते. म्हणून समिती या चौकशी समितीच्या कार्यपध्दतीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करते. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करते की, ज्या अधिकाऱ्यांची चौकशी करावयाची आहे त्याविरुध्द बाजू मांडण्यासाठी त्याच दर्जाच्या समतुल्य वा वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी आणि अशी चौकशी तीन महिन्याच्या आत झाली पाहिजे यासाठी सध्याच्या प्रचलित नियमात दुरुस्ती करण्यात यावी.**

समिती अशी शिफारस करते की, भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांनी आपल्या संपतत्तीबाबत दिलेली बंद लिफाफ्यातील विवरणपत्रे दरवर्षी उघडून पाहण्यात यावीत. मुख्य सचिवांनी प्रतिवर्षी ती माहिती वाचून संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनिय अहवालामध्ये त्यांची नोंद घ्यावी व काही संशयास्पद वाटल्यास त्वरीत चौकशी करण्यात यावी. यासाठी मुख्य सचिवांच्या परवानगीची अट काढून टाकण्यात यावी व यासाठी प्रचलीत नियमात दुरुस्ती करण्यात यावी.

एखाद्या भारतीय प्रशासकीय अधिकाऱ्यावर अथवा कुठल्याही वर्ग १, वर्ग २ च्या अधिकाऱ्यांवर प्रथमदर्शनी अपहाराचा आरोप सिध्द होत असल्यास, शासनाने अशा व्यक्ती विरोधी गुन्हा नोंदवण्यास विलंब न करता तात्काळ परवानगी द्यावी. कारण अशा व्यक्तीचे सर्वसंबंधित विभागात लागेबांधे असण्याची शक्यता गृहीत धरुन ते त्यांच्याविरुध्द उपलब्ध पुराव्यांत फेरफार करु शकतात. "जम्मू आणि काश्मिर" राज्य शासनाने यासंबंधात, ज्या कर्मचारी / अधिकाऱ्यांकडे त्यांच्या वैध संपत्तीपेक्षा अधिक संपत्ती सापडेल ती सरकार जमा करण्याचा कायदा केलेला आहे. तसाच कायदा आपल्या राज्यातही करण्यात यावा.

# महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

**सल्लागार करार**

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.६ मध्ये **"सल्लागार करार"** यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, जोडणी प्रकारबाबतच्या चित्रास अंतिमस्वरुप न दिल्यामुळे कंपनीला रुपये ७.९७ कोटीचा वायफळ खर्च करावा लागला.

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी माहिती व साक्षीच्या वेळी मिळालेली तोंडी माहिती विचारात घेता, असे दिसते की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने जानेवार, १९९९ मध्ये वांद्रे ते वरळी दरम्यान समुद्रात आठ मार्गिकेचा एक सेतू बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागार संस्था म्हणून मेसर्स स्वेरडूप (संस्था एस) यांची नियुक्ती करण्यात आली होती. या कामाच्या व्याप्तीमध्ये सर्वेक्षण, संशोधन, नियोजन संकल्पचित्र (टप्पा एक) व प्रकल्प व्यवस्थापन सेवा (टप्पा दोन) याबाबींचा समावेश होता. महामंडळाने सल्लागार संस्था "एस" यांना टप्पा १ चे रुपये ७.९७ कोटी व टप्पा २ चे रु.८.६८ कोटी मिळून रु.१६.६५ कोटींचे प्रदान केले होते. हा करार मार्च, २००३ पर्यंत कार्यान्वित करावयाचा होता. महामंडळाने टप्पा १ वर रु.७.९७ कोटी खर्च केल्यानंतर आठपदरी जोडरस्ता बांधण्याऐवजी ४ पदरी दोन जोडरस्ते बांधण्याचा व तसे संकल्पचित्र सुधारित करण्याचा निर्णय उशीरा फेब्रुवारी, २००३ मध्ये घेतला होता. परिणामी, टप्पा १ चे काम पूर्णपणे नव्याने सल्लागार संस्था "डी" कडून करुन घ्यावे लागले. त्यामुळे सल्लागार संस्था "एस" ला टप्पा १ च्या कामासाठी दिलेले रु.७.९७ कोटीचे प्रदान वायफळ खर्च ठरले.

साक्षीच्या वेळी समितीला मिळालेल्या माहिती नुसार, सदर टप्पा १ व २ चे काम मार्च, २००३ पर्यंत का पूर्ण झाले नाही? याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी अनेक कारणे विशद केली आहेत. या प्रकल्पाविरुध्द काही लोक न्यायालयात गेले व न्यायालयाने स्थगिती दिल्याने पायवाटेची (पोचरस्त्याची) भरणी (रेक्लमेशन) करता आली नाही. त्यामुळे ते काम रखडले. वरळी गावातील मच्छिमारांनी मोठ्या प्रमाणात निदर्शने केली. कारण त्यांची जहाजे मच्छिमारीसाठी त्या भागात जात येत होती व मच्छिमारी करीत होत्या. त्या भागात जर हा पुल

बांधला गेला तर त्यांच्या मच्छिमार, धंद्यावर संकट येणार होते. परिणामी, सल्लागार "एस" यांनी तयार केलेला प्रथमचा आराखडा बदलावा लागला व नवीन आरखडा तयार करावा लागला. शिवाय वरळी ते वांद्रे येथील जोडणीच्या कामामध्ये वरळीच्या नागरिकांनी जागा बदलण्याबाबत निदर्शने केली. त्यामुळे आराखडा व पुलाची मूळ जागा बदलावी लागली. त्यामुळे पुलाच्या लांबीमध्ये वाढ झाली. परिणामी, पुलाची किंमत रु.६६६ कोटीवरुन रु.१३०६/- कोटी पर्यंत वाढली. प्रकल्पात आमुलाग्र बदल करावा लागला. त्याचे सर्वेक्षण, नियोजन, आराखडा यात बदल करावे लागले. खाडीच्या भागात मच्छिमारांच्या जहाजांच्या वाहतुकीसाठी १५० मीटर लांबीचा मुख्य गाळ असलेला केबल स्टेड पुल प्रस्तावित करणे आवश्यक झाले. पुलाची लांबी १.६ किमी.ने वाढवून वरळी डेअरीजवळ जोडपुल बांधावा लागला. तसेच बांधकामाची सामग्री वेळेवर मिळाली नाही आणि बांधकामाच्या व्यवस्थापनाचे काम योग्य पध्दतीने झाले नाही अशा अनेक अडचणी यास कारणीभूत आहेत. त्यामुळे टप्पा १ वरील रु.७.९७ कोटी हा अतिरिक्त खर्च झाल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु सुरुवातीला सल्लागार त्यांना त्यांची रक्कम देण्यात आलेली आहे. तथापि, त्यांनी (सल्लागारांनी) काम केले नाही वा चुकीचे काम केले असे म्हणता येणार नाही अस मतही त्यांनी व्यक्त केले. या प्रकल्पाच्या संदर्भात सुरुवातीला जो आराखडा, संकल्पचित्र व नियोजन तयार करण्यात आले होते तेच मूळात चुकीचे होते असे मत समितीने व्यक्त केले. कारण एकतर अशा प्रकारचा समुद्रात सेतू बांधण्याचा पहिलाच प्रयोग होता. महामंडळाला त्याबाबत अनुभव नव्हता. म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावरील सल्लागार नेमले होते. परंतु या प्रकल्पाबाबत कोणत्या अडचणी निर्माण होतील याबाबत महामंडळाने मूळात कसलाही अभ्यास केला नाही. या शहरातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन सल्लागारांशी सल्लामसलत करुन भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करुन त्यांची अंमलबजावणी अगोदरच करावयास हवी होती. मूळात हा प्रकल्प कार्यान्वित करण्यापूर्वी त्याला प्रसिध्दी देऊन लोकांकडून हरकती मागवावयास पाहिजे होत्या. त्यामुळे पुढील परिस्थिती अगदी स्पष्ट झाली असती व ज्या अडचणी नंतर आल्या त्याबाबत विचारविनिमय करुन सर्वेक्षण, आराखडा-सकल्पचित्र व नियोजन याबाबत अगोदरच उपाययोजना करता आली असती. परंतु महामंडळाने असे काहीच केले नाही. त्याशिवाय लोक न्यायालयात जाऊन प्रकल्पाला विरोध करतील अशी शक्यता होतीच. त्यासाठी

महामंडळाने अगोदरच उच्च न्यायालयात सावधानपत्र (कॅव्हेट) दाखल करणे आवश्यक होते. परंतु अशीही उपाययोजना महामंडळाने केली नव्हती आणि नेमके तसेच घडले. लोक न्यायालयात गेले. त्यामुळे न्यायालयाने स्थगिती दिल्याने प्रकल्पाचे काम रखडले. मूळ आराखड्याच्या जागीच मच्छिमारी होत असल्याने प्रकल्पाविरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. त्यामुळे आराखड्यामध्ये बदल करावा लागला व नवी आरखडा तयार करावा लागला. याशिवाय बांधकामासाठी वापरावयाची सामग्री वेळेवर मिळाली नाही. म्हणजे ही सामग्री वेळेवर मिळण्यासाठी महामंडळाने कोणतेही पूर्व नियोजन केले नव्हते हे अगदी स्पष्ट झाले आहे. एवढा मोठा व महत्वाचा प्रकल्प त्यामुळेच पूर्ण करता आला नाही ही महामंडळाची अक्षम्य चूक आहे यात कसलीही शंका नाही. महत्वाचे म्हणजे प्रकल्पाच्या कामाचे व्यवस्थापनाचे (सुपरव्हिजन) सुध्दा महामंडळाने नेटकेपणाने पार पाडले नाही हे स्वत: महामंडळानेच साक्षीच्या वेळी कबूल केले आहे. म्हणून समिती या निष्कर्षास आली आहे की, महामंडळाच्या चुकांमुळेच सल्लागार "एस" यांना टप्पा १ साठी दिलेले रु.७.९७ कोटी वायफळ गेले आहेत यात कसलीही शंका नाही.

वरील सर्व कारणांचा विचार करता, या प्रकल्पाबाबत महामंडळाने दुर्लक्ष केले, कायदेशीरपणे अडचणी येऊ नयेत म्हणून विधी विभागाचा सल्ला घेऊन कोणतीही पावले उचलली नाहीत. समुचित व्यापारी तत्व तसेच सुजाण वाणिज्यिक प्रथांचा वापर या कामी झाल्याचे समितीस दिसून येत नाही. म्हणून त्यामुळे प्रकल्पाचे काम लांबणीवर पडले. शिवाय रु.६६६/- कोटी खर्चाचा प्रकल्प रु.१३०६/- कोटी खर्चावर गेला म्हणजे दुप्पट खर्च वाढला. वास्तविक व्यवहारीक तत्वात महत्वाचा व्यवहार करताना योग्य ते नियोजन करुन नुकसान होउा नये म्हणून संभाव्य संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहणे. हेच नियोजन शासनाच्या व महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे हा असू नये? समितीच्या मते असे या अधिकाऱ्यांकडे नियोजनाचा अभाव असल्यामुळे हे घडत असावे अशी शंका निर्माण होते. त्यामुळे असे प्रकार घडत असावेत व जनतेच्या पैशाचा अपव्यय केला जात असावा अशी समितीला दाट शंका आहे. कारण समितीने गेल्या दोन वर्षात अनेक महामंडळाची अशी प्रकरणे तपासली आहेत. त्यामध्येही जवळजवळ अशीच परिस्थिती समितीला दिसून आलेली आहे व खर्चात वाढ झालेली आहे. ठरलेल्या खर्चात व कालावधीत प्रकल्प पूर्ण होताना दिसत

नाहीत ही प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय गंभीर बाब असून समिती त्याबाबत तीव्र चिंता व्यक्त करते. मूळात असे प्रकल्प कर्ज काढून बनविण्यात येत आहेत. त्यामुळे कर्जाचा बोजा वाढत आहे. परिणामी सामान्य नागरिकांवरच करवाढ बसणार आहे. याचा विचार शासनाने करुन धोरण ठरविणे आवश्यक आहे. ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे ते प्रकल्प ठरलेल्या कालावधीत व रकमेत पूर्ण करुन त्यापासून शासनाच्या उत्पन्नात वाढ करुन झालेला खर्च लवकरात लवकर वसूल करुन काढलेल्या कर्जाची पतरफेड करणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. मुंबई महानगराच्या पायाभूत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा असून वरील बाबीचा साकल्याने विचार करता समितीच्या मते महामंडळाने या प्रकरणी पुरेशी दक्षता घेतली नसल्याची वस्तुस्थिती स्पष्ट होते. समिती याबाबत तीव्र खेद व्यक्त करते. त्यातील काही समाजकंटकांना या प्रकल्पाचा सुगावा लागताच त्यांनी त्याच ठिकाणी झोपड्या बांधून आपला स्वत:चा फायदा करुन घेतला. हा सुध्दा प्रशासनाचा मोठा गलथानपणा आहे. अत: **समिती या प्रकरणी शिफारस करते की, शासनाने अशा प्रकल्पाच्या ठिकाणी कोणालाही कोणताही गैरफायदा घेता येणार नाही अशा प्रकारे सर्व कायदेशीर तरतुदी करुन त्याची कडक अंमलबजावणी करावी जेणेकरुन कोणालाही असा गैरफायदा घेता येणार नाही. ह्या कामाचा निर्णय घेण्यापासनू ते काम पूर्ण होईपर्यंत यामध्ये वरिष्ठ पातळीपासून जे-जे अधिकारी आहेत व ज्यांनी यामध्ये उणीवा तसेच त्रुटी ठेवल्या व कायदेशीर बाबींची पूर्तता करुन घेण्याकडे दर्लक्ष केले त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन महामंडळाचे अनाठायी गुंतवणूकीमुळे झालेले नुकसान त्यांच्याकडून वसूल करावे.**

या प्रकल्पासंबंधात समितीच्या असेही निदर्शनास आले की, प्रकल्पाच्या जागी स्थानिक समाजकंटांकडून झोपड्या बांधून विकल्या होत्या व त्यामुळे राहणाऱ्या रहिवाशांनी प्रकल्पाच्या विरोधात निदर्शने करुन पुनर्वसनाची मागणी केली आणि महामंडळाने/शासनाने ती मान्य केली त्यामुळेही प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे ही बाब चिंताजनक आहे.

कोणताही नवीन प्रकल्प कार्यान्वीत करण्यापूर्वी त्या भागाचे फोटो सर्वेक्षण, अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे आदि पूर्ण करुन त्याबाबत वृत्तपत्रात प्रसिध्दी द्यावी व जनतेच्या हरकती मागविण्यात याव्यात जेणेकरुन त्यामध्ये आलेल्या हरकती विचारात घेऊन प्रकल्पाचे सर्वेक्षण, संशोधन, संकल्पचित्र व नियोजन याबाबतच्या पुढील अडचणी अगोदरच लक्षात

येतील व त्यानुसार प्रकल्प कार्यान्वीत करणे सहजशक्य, सुलभ व काटकसरीचा ठरेल व वेळेत पूर्णही करता येईल अशा हरकती मागविण्याची पध्दत सद्या प्रचलित नाही. तरीसुध्दा समितीने मांडलेल्या या मुद्यांशी सहमती दर्शवून या शहरात अशा मोठ्या प्रकल्पाच्या वेळेला भविष्यात हरकती मागविणे योग्य ठरेल. याबाबत विभागाच्या सचिवांनी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार पुढे कार्यवाही करण्यात यावी तसेच या पुलाचे काम सद्या दुप्पट वेगाने चालू आहे असे समितीला सांगण्यात आले आहे ते जितक्या लवकर पूर्ण करता येईल तेवढे लवकर पूर्ण करावे व मिळणाऱ्या महसूलातून झालेल्या खर्चाचा ताळेबंद करण्यात यावा.

# महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ

## निविदा न मागवता खाजगी संस्थेला भूखंडाचे नियतवाटप

भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांच्या सन २००४-२००५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१.५ मध्ये **"निविदा न मागवता खाजगी संस्थेला भूखंडाचे नियत वाटप"** च्या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कंपनीने नेरुळ येथील सेक्टर-६ मध्ये स्थित असलेला ५,०९९ चौरस मीटर क्षेत्रफळाचा भूखंड १.५ चटई क्षेत्रासह रुपये १५,६२४ प्रति चौरस मीटर या एटीव्ही प्रोजेक्ट इंडिया मर्यादित (संस्था) यांना नियतवाटप (नोव्हेंबर, २००३) केला होता. कंपनीला मिळालेले एकूण जमीन अधिमूल्य रुपये ७.९७ कोटी होती.

या प्रकरणी समितीला मिळालेली लेखी व तोंडी माहिती विचारात घेता असे दिसून येते की, सिडकोने नेरुळ येथील ५०९९ चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड रु.१५,६२४ प्रति चौ.मी. दराने एटीव्ही प्रोजेक्टस इंडिया मर्यादित या संस्थेला निविदा न मागविता नियतवाटप केला. हा भूखंड निविदा मागवून रु.१९,७२३ प्रति चौ.मी. दराने विकला गेला होता. त्यामुळे या प्रकरणी सिडकोचे रु.२.०९ कोटी महसूलाचे नुकसान झाले होते. या प्रकरणी एक जनहित याचिका न्यायालयात केली गेल्यानंतर जमिनीचे अतिरिक्त अधिमूल्य केले गेले. त्याचवेळी शासनानेही या प्रकरणी डॉ.शंकरन् समिती नेमली. त्या समितीने या भूखंडाच्या फरकाची किंमत रु.५.५ कोटी एवढी काढली व त्याप्रमाणे संस्थेकडे फरकाच्या जादा रकमेची मागणी करण्यात आली आहे. रक्कम भरण्याबाबत विकासकाने मुदतवाढ मागितली आहे. म्हणजे फरकाची रक्कम भरण्यास संस्था तयार आहे हे उघड आहे. जर या प्रकरणी निविदा काढल्या असत्या तर दर नक्कीच जादा मिळाला असता हेही उघड आहे. परंतु, सिडकोने कॉर्पोरेट ऑफिस शिफ्टिंगच्या योजनेप्रमाणे केवळ वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिली व हा भूखंड विकला. त्यामुळे दर कमी मिळाला. वास्तविक मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयानुसार लिलाव पध्दतीशिवाय इतर कुठल्याही पध्दतीने भूखंडाचे नियतवाटप करावयास नको होते. परंतु त्याऐवजी पूर्वीच्या पध्दतीने नियतवाटप केले. यामध्ये चूक झाली असावी असे साक्षीच्या वेळी सांगण्यात आले. समितीच्या मते जर हे प्रकरण न्यायालयात गेले नसते तर ही फरकाची जादा रक्कम सिडकोस मिळण्याची शक्यता नव्हती. अर्थात सिडकोने स्वत:च हे नुकसान केले होते. परंतु, जागृत नागरिकांच्या सावधानतेमुळे सिडकोस हा जादा महसूल मिळणार आहे. त्यामुळे सिडकोचा फायदा होणार आहे हे निश्चित. म्हणून अशा

जागृत नागरिकांनाही त्यांनी घेतलेल्या कष्टाबद्दल काही लाभांश मिळाला पाहिजे. जसे केंद्राच्या कस्टम खात्यात १० टक्के इनाम देण्याची योजना आहे त्या धर्तीवर शासनाचा/महामंडळाचा महसूल बुडविणाऱ्या घटना उघडकीस आणणाऱ्या जागृत नागरिकांना याचा काहीसा लाभ मिळणार असल्यास असे नागरिक पुढे येतील व शासनाचा फायदा होईल. याप्रकरणी सुनावणी करुन एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन समितीला देण्यात आले ओह. समिती या प्रकरणी शिफारस करते की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयानुसार या पध्दतीने विकावयाचे भूखंड केवळ लिलाव पध्दतीनेच विकण्यात यावेत जेणेकरुन सिडकोस जास्तीत जास्त महसूल प्राप्त होईल. तसेच या प्रकरणात शंकरन समितीचा अहवालावर एक महिन्यात निर्णय घेऊन अधिकची रक्कम वसूल करण्यात यावी. जर संस्था रक्कम भरण्यास तयार नसेल तर करार रद्द करुन भूखंड त्यांच्याकडून काढून घेण्यात यावा. तसेच जनहित याचिकेतर्फे हे व अशी प्रकरणे उघडकीस आणणाऱ्या जागृत नागरिकांनाही बक्षीस देण्याची योजना सुरु करण्यात यावी.